# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे

## हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कल्याण (प.) (सुभेदारवाडा)

## वार्षिक अहवाल २०१९-२०२०

**प्रमुख पाहुणे : मा. श्री. मेघन गुप्ते**
(आंतरराष्ट्रीय नाट्यभूषण पुरस्कार विजेते)

**समारंभाचे अध्यक्ष : मा. श्री. अभय वसंत बोरकर**
(निवृत्त डी.जी.एम. महिंद्रा अँन्ड महिंद्रा कंपनी)

संचालक - ज.ए.इ. दादर व शालेय समिती अध्यक्ष - ज.ए.इ.चे हायस्कूल व ज्युनि. कॉलेज, (कल्याण) शाळेचे माजी विद्यार्थी, पारितोषिक ठेवीदार या शाळेचे आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर, कर्मचारी, सेवक, सन्माननीय निमंत्रित, शाळेतील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी, उपस्थित पालक, बंधू आणि भगिनींनो आपल्या हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

### * व्यवस्थापन *

शाळेच्या व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी **सौ. जावळे पी. आर** (B.Sc., B.Ed.)DSM

उपमुख्याध्यापिका : **श्रीमती बेंद्रे एस्. अे.** (B.Sc., B.Ed.M.Ed.)

पर्यवेक्षक पदावर : **श्री. पवार पी. बी.** (बी.एससी., बी.एड्. डी.एस्.एम.)

हे कार्यरत आहेत.

### * बदली / पदोन्नती *

* दि. १ ऑगस्ट २०१९ पासून सौ. जावळे पी. आर. यांची उरण येथून पदोन्नतीने मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत.
* दि. १ ऑगस्ट २०१९ पासून श्रीमती बेंद्रे एस्. अे. यांची उपमुख्याध्यापक पदी पदोन्नती झालेली आहे.
* दि. १ ऑगस्ट पासून श्री. पवार. पी. बी. यांची पर्यवेक्षक म्हणून संस्थेच्या प. रा. विद्यालयातून बदली झालेली आहे.
* दि. १ जुलै २०१९ पासून श्री. शेंडे आर. एच. यांची उपमुख्याध्यापक म्हणून न्यू. हायस्कूल कल्याण या ठिकाणी बदली झालेली आहे.

* दि. १ जुलै २०१९ पासून सौ. लोहार जे. एम्. यांची संस्थेच्या स. वा. जोशी विद्यालयात पर्यवेक्षिकापदी बदली झालेली आहे.

## * सेवा निवृत्ती *

या शैक्षणिक वर्षामध्ये सौ. पाठक पी. पी. व श्री. पारुंडेकर जे. डी., श्री. सूर्यवंशी एम्. बी. हे सरकारी नियमाप्रमाणे सेवा निवृत्त झाले.

## * शैक्षणिक *

अ) १) फेब्रुवारी / मार्च २०१९ कला विभाग शाखेचा निकाल – ६४%

प्रथम क्रमांक – कुमारी दळवी शालिनी पांडुरंग – ८७.३३%

२) इयत्ता १२वी –अकाऊंटींग व ऑडिटिंग – निकाल – ९२%

प्रथम क्रमांक – कुमारी दळवी प्रमिला मनोहर – ८३.६९%

३) इयत्ता १२वी – इलेक्ट्रॉनिक व टेक्नॉलॉजी – निकाल – ४७.६१%

प्रथम क्रमांक – पवार गौरव तुकाराम – ६८%

ब) मार्च २०१९ इयत्ता १०वी शालान्त परीक्षा निकाल – ९२.६९%

प्रथम क्रमांक – कु. आदित्य सुरेश आव्हाड – ९६.५०%

व्दितीय क्रमांक कु. हुलवले पियुष पांडुरंग – ९३.६६%

तृतीय क्रमांक कु. गोयल हिमांशु कैलाश – ९३.३३%

## * नेने ढाल

संस्थेच्या सर्व शाळांमधील ज्या शाळेची शालान्त परीक्षेच्या निकालाची टक्केवारी प्रथम क्रमांकांची असते त्या शाळेस **"नेने ढाल"** दिली जाते. या वर्षी ही ढाल आपल्या शाळेस मिळाली आहे.

## * कै. सुशांत संदीप वैद्य करंडक *

पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५वी) शिष्यवृत्ती परीक्षेत ज्या शाळेची उत्तीर्णतेची टक्केवारी जास्त असेल त्या शाळेस कै. सुशांत वैद्य स्मृती ढाल प्रदान करण्यात येते. ही ढाल या वर्षी आपल्या शाळेस मिळाली आहे.

कुमार आव्हाड पार्थ नवनाथ इ. ५वी. जिल्ह्यातून १७७ क्रमांक

## * सांस्कृतिक समिती अहवाल *

सालाबाद प्रमाणे २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षात सांस्कृतिक समितीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करुन पार पाडले.

गुरुपौर्णिमा, लोकमान्य टिळक पूण्यतिथी, द. बा. बाहेकर यांच्या प्रित्यर्थ वक्तृत्व स्पर्धा, इ. ५वी ते इ. १२ वी. सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, १४ सप्टेंबर हिंदी भाषा दिन, २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती, २६ नोव्हेंबर - महात्मा जोतिबा पूण्यतिथी, ६ डिसेंबर-२०१९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन, अक्षीकर दिन, सावित्रीबाई फुले जयंती व पूण्यतिथी, मराठी भाषा दिन, छत्रपती शिवाजी महाराज जयंती इत्यादि कार्यक्रम साजरे केले जातात.

## * क्रीडा विभाग *

२१ जून २०१९ – योगदिन साजरा करण्यात आला.

१७ डिसेंबर २०१९ ते २० डिसेंबर २०१९ – क्रीडा महोत्सव

क.डो.म.पा. क्रीडा स्पर्धेत २२८ विद्यार्थी सहभाग

१) पोखरकर मयुरी राजन – १० ब.– योगासने

२)म्हात्रे साक्षी मधुकर – १० ड. – जलतरण

३) पाटील प्रांजल अविनाश – ६ अ. – आर्टिस्टीक जिमनॅस्टीक (राज्यपातळीवर निवड)

४) चिंचनसुरे ऋतुजा अॗुल – ७ क. – टेबल टेनीस (राज्यपातळीवर निवड)

५) लोखंडे रोहित नवनाथ – १०ड. – कुस्ती

६) केणे मयुर सुनिल – १२ M.C.V.C. – कुस्ती (राज्यपातळीवर निवड)

७) गायकवाड सानिया संजय – १० अ. – गोळाफेक

याशिवाय १४ वर्षाखालील व १७ वर्षाखालील दोन्ही कबड्डी संघाची जिल्हास्तर स्पर्धा जिंकून विभागीय पातळीवरील स्पर्धेत सहभाग.

* कु. चिंचनसुरे ऋतुजा अतुल – जिल्हा पातळी वरील १० स्पर्धां मध्ये सहभाग व नैपुण्यप्राप्त

* दि. ७ ते ११ सप्टेंबर २०१९ – नागपूर – राज्यस्तरीय टेबल टेनिस तृतीय क्रमांक

* दि. १८ ते दि. २२ सप्टेंबर २०१९ – ठाणे राज्यस्तरीय टेबल टेनिस – तृतीय क्रमांक

दि. ०३ ते दि. ६ नोव्हेंबर २०१९ – पुणे – बालेवाडी ५० व्या आंतरजिल्हा व ८१ व्या राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेतील व तिच्या संघाला सुवर्णपदक प्राप्त

* दि.१६ ते दि. २२ नोव्हेंबर २०१९ धर्मशाळा, हिमाचल प्रदेश येथे झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत कास्यपदक प्राप्त या शिवाय वर्षभरात सांगली, परभणी, हरियाणा, केरळ, प. बंगाल, गुजरात या ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील टेबलटेनिस स्पर्धेत सहभाग.

**※ टाकळकर नंदिनी नितीन – खेळ – कराटे.**

दि. १० नोव्हेंबर २०१९ – न्यू पनवेल – रौप्यपदक

दि. २४ नोव्हेंबर २०१९ – ठाणे – राष्ट्रीय स्तरावरील प्रथम क्रमांक

दि. २४ नोव्हेंबर २०१९ – ठाणे – राष्ट्रीय स्तरावरील कुमिटे – कराटे स्पर्धेत तृतीय क्रमांक

**※ कु. पाटील प्रांजल अविनाश – खेळ – आर्टिस्टिक जिमनॅस्टिक**

भोईर जिमखाना डोंबिवली जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक

भारतीय क्रीडा मंदीर वडाळा येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत सहावा क्रमांक व राष्ट्रीय पातळीवर निवड

औरंगाबाद – राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत संघाला सुवर्णपदक तर तीला वैयक्तिक (FLOOR EXERCISE) साठी ब्रॉन्झपदक

## ※ बहि:शालेय परीक्षा ※

सेंट थॉमस शाळेत वकृत्व स्पर्धेत सातपुते पारस दिलीप – दुसरा क्रमांक

गणित अभ्यासक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या MAT परीक्षेस २६ विद्यार्थी बसले. तसेच महाराष्ट्र प्रज्ञाशोध, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, महाराष्ट्र प्रज्ञाशोध परीक्षा (M.P.S.P.), स्कॉलरशिप परीक्षा, डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा आयोजित केल्या जातात त्यात विद्यार्थी सहभागी होतात. कु. साक्षी बैष्णवप्रसाद रानडे सुवर्ण पदक प्राप्त. इंग्रजी मॅरेथॉन स्पर्धा परीक्षेमध्ये अनेक विद्यार्थी सहभाग. महाराष्ट्र ज्ञानपीठ आयोजित इंग्रजी, हिंदी, गणित व संस्कृत या विषयांच्या परीक्षांना विद्यार्थी प्रविष्ठ होतात.

## ※ विज्ञान विभाग ※

क.डो.म.पा. तर्फे आयोजित CRC विज्ञान प्रदर्शन शाळा क्र. १ मध्ये झालेल्या विज्ञान प्रदर्शनात इ. ६वी तील विद्यार्थी कु. चिन्मय पंकज चौधरी व कु. स्वानंद सुहास सुतार – तृतीय क्रमांक

※ दि. १२ डिसेंबर २०१९ – शालेय पातळीवर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन. एकूण ५२ प्रकल्प होते.

त्यातून इ. ५वी ते इ. ८वी – लहानगट
१. अजिंक्य राहुल वाघ – ६ क. – प्रथम क्रमांक
२. अनुराग संदिप चव्हाण – ७ क. – व्दितीय क्रमांक
३. आदित्य योगेश पालवे – ७अ. – तृतीय क्रमांक

इ. ९ वी. ते इ. १० वी.
ईषा संतोष पवार – ९ क. – प्रथम क्रमांक
पारस दिलीप सातपुते – ९ अ. – व्दितीय प्रमांक
आळशी हर्ष संचित – ९ अ. – व्दितीय क्रमांक
प्रांजल अरुण भोईर – ९ ड. – तृतीय क्रमांक

पंचायत समिती तर्फे होणाऱ्या तालुका स्तरावरील विज्ञान प्रदर्शनात सहभाग

स. वा. जोशी विद्यालय, डोंबिवली विज्ञान प्रदर्शनात कु. साक्षी वैष्णवप्रसाद रानडे व उर्शिता चंद्रकांत चौधरी यांनी सादर केलेल्या " हाइड्रम पम्प" या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला.

## * निकाल सुधार विभाग *

इ. १० वी. व इ. १२ वी. च्या विद्यार्थ्यांसाठी आठवडी सराव परीक्षा घेतली जाते. प्रत्येकी ३० गुणांचे २ संच व सहामाही व संपूर्ण अभ्यास क्रमावर आधारीत प्रत्येकी एक संच विद्यार्थ्यां कडून सोडवून घेतले जातात.

## * स्काऊट गाईड / N.C.C. *

सन २०१९-२०२० या शैक्षणिक वर्षामध्ये शाळेत स्काऊट - गाईडचे १० युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात ६४० विद्यार्थी तसेच छ.उ.उ. विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

## * पालक शिक्षक संघ व शालेय व्यवस्थापन संघ *

शाळेत पालक-शिक्षक संघ व शालेय व्यवस्थापन संघ कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून शाळेच्या हिताच्या दृष्टीने व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विचार विनिमय करुन निर्णय घेतले जातात.

## * विशेष (इतर) उल्लेखनीय *

* इ. १० वी. तील विद्यार्थ्यांसाठी डॉ. पराग पाटील यांचे लैगिक शिक्षणावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
* P&G तर्फे इ. ७ वी. व इ. ८वी. तील मुलींसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.
* अविष्कार एज्युकेशन कल्याण भूषण पुरस्कार श्री. पाटील विकास मुकुंदराव सरांना मिळाला.
* सौ. फडे व्ही. एस. यांचा DIECPD तर्फे राहटोली ज़िल्हास्तरीय तज्ञ मार्गदर्शक म्हणून निवड तसेच आंध्र प्रदेश अक्षस्त्या एन्टरनॅशनल केंद्र येथे राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणात सहभाग.
* श्री. सहस्त्रबुध्दे ए. जी. यांना लायन्स क्लब ऑफ कल्याण तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे.
* श्री. पाठक एन्. एम्. यांना संस्थेचा व भा.ज.पा. शिक्षक आघाडी तर्फे वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे.

या शाळेवर उदंड प्रेम करणाऱ्या ज्ञात-अज्ञातांचे ऋण निर्देश व्यक्त करून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

**सौ. जावळे पी. आर.**

मुख्याध्यापिका